

मुंबईत आज १०६ ठिकाणी शिव आरती व शिव जल्लोष होणार

पान : महामुंबई

RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED

शब्दांना सत्याची धार

# प्रहार

www.prahaar.in epaper.prahaar.in

क्रीडा SPORTS



कार्लोस अल्काराजची विजयी घौडदौड सुरूच

मुंबई • रविवार, १३ जुलै २०२५ | मुंबई, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक येथून एकाचवेळी प्रसिद्ध • वर्ष २१ • अंक २७५ • पाने १४ (कोलाजसह) • ₹ ५.००


# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून सप्टेंबर महिन्यात पहिले ‘टेक ऑफ’

## ‘बॅग क्लेम’ प्रणाली कार्यान्वित करण्याची मुख्यमंत्री फडणवीस यांची सूचना

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर जगातील सर्वात जलद ‘बॅग क्लेम सिस्टीम’ विकसित करण्यात यावी, हे या विमानतळावरील प्रमुख वैशिष्ट्य असावे, अशी सूचना शनिवारी मुख्यमंत्र्यांनी संबंधितांना येथे दिली. सद्यःस्थितीत या विमानतळाचे ९४ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित सहा टक्के काम सप्टेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करून सप्टेंबरमध्येच पहिले प्रवासी विमान उडणार, याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रगतिपथावरील कामाची पाहणी करताना ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वनमंत्री गणेश नाईक, माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी, मंदा म्हात्रे, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रगतिपथावर असलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. ही पाहणी करताना त्यांनी विशेषतः विमान प्रवाशांना देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांचा आढावा घेतला. या विमानतळाचे भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले होते आणि त्याचे उद्घाटनही आता त्यांच्याच हस्ते होणार आहे, याचा विशेष आनंद असल्याचेही ते शेवटी म्हणाले.

सिडकोतर्फे १ हजार १६० हेक्टर क्षेत्रामध्ये ५.५ मीटरपर्यंत भूविकास, उलवे नदीचा प्रवाह वळविणे आणि उच्च दाबाच्या विद्युत वाहिन्यांचे स्थानांतरण, ही विकासपूर्व कामे पूर्ण करण्यात आली आहेत. ११ ऑक्टोबर २०२४ रोजी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर भारतीय हवाई दलाच्या वाहतूक विमान सी-२९५ द्वारे उद्घाटन लँडिंग करण्यात आले आणि त्यानंतर एसयू ३० ने दोन लो पास केले आहेत. इंडिगो एअरलाइन्सच्या एअरबस ए ३२० ने २९ डिसेंबर २०२४ रोजी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर पहिले व्यावसायिक लँडिंग यशस्वीरीत्या पूर्ण केले.

**कसा आहे मिसिंग लिंक प्रकल्प? :** मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील या मिसिंग प्रकल्पामध्ये खोपोली एक्झिटपासून लोणावळ्यापर्यंत दोन्ही दिशेने ४ मार्गिकांसाठीचे दोन बोगदे उभारण्यात आले आहेत. यातील पहिला बोगदा ८.९२ किमी, तर दुसरा बोगदा १.७५ किमीचा आहे. तर या बोगद्याला जोडणारा आणि टागर व्हॅलीवर बांधला जाणारा केबल-स्टेड पूल जमिनीपासून सुमारे १३२ फूट उंचीवर आहे. मुख्यमंत्र्यांनी ही सर्व पाहणी केली.

### मिसिंग लिंकमुळे एक्स्प्रेस वेवरील ६ किमीचे अंतर होणार कमी

■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी मिसिंग लिंक प्रकल्पाची पाहणी केली. मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील खोपोली एक्झिट ते कुसगाव या भागात मिसिंग लिंक प्रकल्प उभारण्यात आला आहे. मिसिंग लिंक प्रकल्पामुळे मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर ट्रॅफिक कमी होणार आहे. मिसिंग लिंकमुळे ६ किमीचे अंतर कमी होणार आहे व मुंबई-पुणे प्रवासासाठी अर्धा तास कमी लागणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

■ मिसिंग लिंक जगातला सगळ्यात रुंद बोगदा आहे. हा मार्ग लोणावळा लेकच्या खाली हजार फूट असणार आहे. जगातला सर्वात ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी वापरून हा मिसिंग लिंक तयार केला आहे. यामुळे नेहमीच्या वेळापेक्षा मुंबई-पुणे प्रवासासाठी अर्धा तास कमी लागणार आहे. मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे पर्यायी रस्ता (मिसिंग लिंक) लवकरच तयार होणार आहे. हा प्रकल्प २०१९ मध्ये सुरू करण्यात आला असून अनेकदा त्याला मुदतवाढ देण्यात आली आहे. आता ऑक्टोबरपर्यंत २०२५ पर्यंत मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे मिसिंग लिंक प्रकल्प पूर्ण करण्याचे आदेश दिल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

# महापालिका निवडणुका महायुती एकत्र लढणार

## भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडून संभ्रम दूर

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

येत्या ऑक्टोबर ते डिसेंबर दरम्यान राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका होणार आहेत. त्यासाठी सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. महायुती एकत्रित लढणार असल्याचे सांगत



महायुती एकत्र निवडणूक लढणार की स्वबळावर याबाबतचा संभ्रम संभ्रम भाजपचे नवे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दूर केला आहे.

त्यातच राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे दोन्ही भाऊ एकत्रित या निवडणुका लढण्याचे संकेत मिळत असल्याने राज्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे, तर दुसरीकडे महायुतीनेही निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. पण भाजपचे नवे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी वृत्तवाहिन्यांशी बोलताना निवडणुकांबाबत भूमिका स्पष्ट केली. यावेळी त्यांनी महायुती म्हणूनच महापालिका निवडणुका लढवणार असल्याचे जाहीर केले. महापालिका निवडणुका या कार्यकर्त्यांच्या निवडणुका आहेत. त्या महायुती म्हणूनच लढवल्या जातील.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात अधिवेशन संपल्यावर प्रत्येक विभागात आम्ही जाणार आहोत. कार्यकर्ते आणि जिल्ह्याच्या टीमशी संवाद साधणार आहोत. भेटीगाठी होणार आहेत. कार्यकर्ता आणि नेता एकत्र चर्चा करतील. येणाऱ्या काळात महायुतीचे चांगले वातावरण करू आणि सर्व महापालिकांच्या निवडणुका महायुती म्हणूनच लढू. मुंबई ठाणे पालिकेच्याही लढू. आम्हाला वातावरण पोषक आहे. त्यामुळे एकत्र लढण्याचे ठरवले आहे, असे रवींद्र चव्हाण यांनी सांगितले.

हिंदीबाबतचा संभ्रम कोणात नाही. फक्त राज आणि उद्धव ठाकरेंमध्ये संभ्रम आहे. त्यांचा संभ्रम दूर करण्याचा सरकारने प्रयत्न केला आहे. पण त्यांनी हा मुद्दा निवडणुकीचा केला असेल तर त्याला काही करू शकत नाही. वाहिन्यांनीही त्याकडे दुर्लक्ष केले पाहिजे. एखादा मुद्दा किती वेळ चालवावा यासाठी समिती स्थापन केली आहे. समिती या संदर्भातील अभ्यास करून अहवाल तयार करणार आहे. विधानसभेत तो पाठवेल, अशी माहिती भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिली.

### महापौरपदाचा निर्णय मुख्यमंत्रीच घेणार

मुंबई महापालिकेच्या फॉर्म्युल्यावर वरिष्ठ पातळीवर त्यांची, आमची कोअर टीम बसून चर्चा करतील. जागा वाटपाचे सूत्र ठरवतील. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार एकत्र बसून जागा वाटप ठरवतील. या नेत्यांचा राजकारणातील प्रदीर्घ अनुभव आहे. तेच जागा वाटपाचे सूत्र ठरवतील, असे सांगतानाच महापौर पदाबाबतचा निर्णय त्यावेळी होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठरवले तर महापौरपद एकनाथ शिंदे गटाला देऊ, असे रवींद्र चव्हाण यावेळी म्हणाले.

## वेचक

### ‘समृद्धी’वर गोळीबार

**छत्रपती संभाजीनगर :** समृद्धी महामार्गावर सावंगी जवळ असलेल्या टोलनाक्यावर गोळीबार झाल्याची घटना शुक्रवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास घडली. दोन कर्मचाऱ्यांच्या झटापटीत ही घटना घडली आहे. जखमी कर्मचाऱ्याला घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर गोळी झाडणारा कर्मचारी फरार झाला आहे. त्याच्या शोधात पोलिसांचे दोन पथक रवाना करण्यात आले आहेत. समृद्धी महामार्गावरील गेट क्रमांक १६ येथे भारत घाटगे आणि करण भालेराव हे टोल भरणाऱ्या प्रवाशांचे गाड्या सोडण्याचे काम करत होते.

### दिल्लीत इमारत कोसळली

**नवी दिल्ली :** दिल्लीच्या ठाणे वेलकम परिसरामधील जनता मजदूर कॉलनीमध्ये शनिवारी चार मजली इमारत कोसळल्याची घटना घडली आहे. या घटनेत दोन जणांचा मृत्यू झाला आहे. या इमारतीखाली अनेक जण अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. या घटनेबाबत अधिकाऱ्यांनी सांगितले की, इमारतीत राहणाऱ्या दहा सदस्यांसह इमारत कोसळण्याच्या वेळी जवळ असलेले काही लोक अडकले होते. दिल्ली अग्निशमन दलाने ही चार मजली इमारत कोसळल्याच्या घटनेनंतर ढिगाऱ्याखाली एक पुरुष व एक महिला मृत आढळल्याची पुष्टी केली आहे.

### ‘कुनो’त चित्याचा मृत्यू

**नवी दिल्ली :** मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात नामिबियातून आणलेल्या आठ वर्षीय मादी चित्ता ‘नाभा’ हिचा शनिवारी मृत्यू झाला. एका आठवड्यांपूर्वी ‘सॉफ्ट रिलीज बोमा’मध्ये शिकारीच्या प्रयत्नावेळी तिला गंभीर दुखापत झाली होती. रुग्णालयात उपचार सुरू असताना नाभाचा मृत्यू झाल्याचे वन विभागाने स्पष्ट केले आहे. आठ वर्षीय मादी चित्ता ‘नाभा’ ही काही दिवसांपूर्वी ‘सॉफ्ट रिलीज बोमा’मध्ये शिकारीच्या प्रयत्नावेळी गंभीर जखमी झाली.

| सोन्याचा भाव | |
|---|---|
| २४ कॅरेट प्रति तोळा | ९९,७१० रुपये |
| २२ कॅरेट प्रति तोळा | ९१,४०० रुपये |

| चांदीचा भाव | |
|---|---|
| प्रति किलो | १,११,००० रुपये |

# आ. शशिकांत शिंदे राष्ट्रवादीचे नवे प्रदेशाध्यक्ष

## मंगळवारी मुंबईत अधिकृत घोषणा होण्याची शक्यता

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षामध्ये नेतृत्वाची भाकरी अखेर फिरली गेली आहे. गेल्या काही दिवसांपासून प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील पदावरून पायउतार होणार असल्याची चर्चा रंगली होती. अखेर त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांच्या जागी आमदार शशिकांत शिंदे यांची निवड करण्यात आली आहे.

शरद पवार यांनी भाकरी फिरवताना पश्चिम महाराष्ट्रामधीलच निष्ठावंत चेहरा प्रदेशाध्यक्षपदावर निवडला आहे. त्यामुळे शशिकांत शिंदे यांच्यासमोर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पायाला भिंगरी लावून फिरण्याचेच आव्हान असणार आहे. मंगळवार, दि. १५ जुलै रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये राष्ट्रवादीच्या होणाऱ्या कार्यक्रमात याबाबत घोषणा करण्यात येणार आहे.



आमचे नेते शरद पवारसाहेब, सुप्रियाताई आणि जयंत पाटील जो निर्णय घेतील तो आपल्याला मान्य राहणार असल्याची प्रतिक्रिया प्रदेशाध्यक्षपदासाठी नाव चर्चेत येताच शशिकांत शिंदे यांनी व्यक्त केली आहे. नवी मुंबईतील माथाडी वर्गामध्ये तसेच सातारा जिल्ह्यात या चर्चेमुळे जल्लोष साजरा करण्यास सुरुवात झाली आहे.

# ‘बिना पर्ची, बिना खर्ची’ ब्रीदनुसार नोकऱ्या

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते ५१ हजार जणांना नियुक्तिपत्रे



◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी ‘रोजगार मेळा’ या उपक्रमाअंतर्गत देशभरातील विविध सरकारी विभागांमध्ये निवड झालेल्या ५१ हजार नव्या उमेदवारांना नियुक्तिपत्रांचे वितरण केले. हा कार्यक्रम देशभरातील ४७ ठिकाणी एकत्रितपणे पार पडला.

या कार्यक्रमात पंतप्रधान मोदी व्हर्च्युअल माध्यमातून सहभागी झाले आणि उमेदवारांशी संवाद साधला. ते म्हणाले, ‘बिना पर्ची, बिना खर्ची’ हे आमचे ब्रीद आहे. रोजगार मेळ्याच्या माध्यमातून लाखो युवकांना नोकऱ्या मिळाल्या आहेत आणि ते राष्ट्राच्या प्रगतीत मोलाचे योगदान देत आहेत.

पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की, काही उमेदवार हे देशाच्या सुरक्षेसाठी काम करतील.

### कोणकोणत्या विभागांमध्ये नियुक्त्या?

या नव्या भरती प्रक्रियेमध्ये केंद्रीय रेल्वे मंत्रालय, गृह मंत्रालय, पोस्ट विभाग, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, आर्थिक सेवा विभाग, कामगार, रोजगार मंत्रालय यांसारख्या महत्त्वाच्या विभागांचा समावेश आहे.

### काय आहे ‘रोजगार मेळा’?

‘रोजगार मेळा’ हा केंद्र सरकारचा महत्त्वाकांक्षी उपक्रम असून २०२२ पासून त्यातून देशभरात युवकांना शासकीय आणि सार्वजनिक क्षेत्रातील विविध पदांवर रोजगाराची संधी मिळवून दिली जाते. याचा उद्देश म्हणजे युवकांना विकासात भाग घेण्यास प्रोत्साहित करणे या उपक्रमांतर्गत आतापर्यंत १० लाखांहून अधिक नियुक्तिपत्रांचे वितरण झाले आहे.

# दादर पश्चिम फेरीवाल्यांवर कारवाईचा केवळ फार्सच!

◆ मुंबई (खास प्रतिनिधी) :

मुंबईतील रेल्वे स्थानकांसह महत्त्वाच्या ठिकाणी फेरीवाल्यांवर पोलीस व महानगरपालिकेच्यावतीने संयुक्तपणे कारवाई सुरू असली तरी प्रत्यक्षात बोरिवली वगळता कुठेही ठोस कारवाई दिसून येत नाही. दादर पश्चिम रेल्वे स्थानकाच्या परिसरातही ही कारवाई सुरू असली तरी फारशी कारवाई दिसून येत नाही. रेल्वे स्थानकाला विळखा आणि दुरवर कारवाई केली जात असल्याने आग रामेश्वरी अन् बंब सोमेश्वरी असाच प्रकार दिसून येत आहे.



महापालिकेच्यावतीने रेल्वे स्थानकांसह २० ठिकाणे फेरीवाला मुक्त करण्याचा निर्णय घेतल्यानंतर पोलीस आयुक्तपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर देवेन भारती यांनी पोलिसांना सूचना देत सर्व रेल्वे स्थानके फेरीवालामुक्त करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे ६ मे २०२५ पासून दादर पश्चिम रेल्वे स्थानक परिसर फेरीवालामुक्त करण्याच्या कारवाईला सुरुवात झाली. महापालिका व पोलीस यांच्या माध्यमातून कारवाई सुरू असली तरी प्रत्यक्षात या कारवाईचा प्रभाव दिसून येत नाही. स्थानक रोड असलेल्या न्यायमूर्ती रानडे मार्गांवर कारवाई केली असेल तर स्थानकाबाहेर तसेच डिसिल्व्हा मार्ग आणि जावळे मार्गावर फेरीवाले हे ठाम मांडून व्यवसाय करताना दिसतात. मात्र दीडशे मीटर बाहेरील एन. सी. केळकर मार्गावर कारवाई केली जाते. एवढेच काय तर रात्री साडेसातनंतर तर रेल्वे स्थानकाला पुन्हा फेरीवाल्यांचा विळखा पडतो.

# युरोपियन युनियन, मेक्सिकोवर अमेरिकेचा टॅरिफ बॉम्ब

## मेक्सिकोतून अमेरिकेत ड्रग्जची तस्करी होत असल्याचा आरोप

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मेक्सिको व युरोपियन युनियनवर ३० टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा केली आहे. मेक्सिको व युरोपियन युनियनवरील टॅरिफ १ ऑगस्टपासून लागू होणार आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी मेक्सिकोवर टॅरिफ लादताना एक लेटर पाठवले आहे.

मेक्सिकोतून अमेरिकेत ड्रग्जची तस्करी होत असल्याचा आरोप ट्रम्प यांनी केला आहे. युरोपियन युनियनमुळे व्यापारात असंतुलन निर्माण होत असल्याचा दावा ट्रम्प यांनी केला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी सहा व्यापारी भागीदार देशांवर टॅरिफ लादले होते. त्यामध्ये लीबिया, अल्जीरिया, इराक, मोल्दोवा, फ्लीलीपीन्स आणि ब्रुनोईचा समावेश होता.

डोनाल्ड ट्रम्प यांनी आतापर्यंत २० हून अधिक देशांवर टॅरिफ लादण्याची घोषणा केली आहे. यामध्ये म्यानमार, दक्षिण आफ्रिका, दक्षिण कोरिया आणि जपानचा देखील समावेश होता. डोनाल्ड ट्रम्प यांनी यामध्ये अमेरिकेच्या मित्र देशांना देखील सोडले नाही.

### कोणत्या देशावर किती टॅरिफ?



अमेरिकेने ब्राझीलवर सर्वाधिक ५० टक्क्यांपेक्षा अधिक टॅरिफ लादण्याची घोषणा केली आहे. दुसऱ्या क्रमांकावर म्यानमार आणि लाओसवर ४०-४० टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा अमेरिकेने केली आहे. कंबोडिया आणि थायलंड ३६ टक्के, बांगलादेश आणि सर्बियावर ३५ टक्के, इंडोनेशियावर ३२ टक्के, बोस्निया आणि हर्जेगोविनावर ३० टक्के, दक्षिण आफ्रिकेवर ३० टक्के, जपान, कझाकिस्तान, मलेशिया, दक्षिण कोरिया आणि ट्यूनिशियावर २५ टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा केली आहे. दरम्यान, भारत आणि अमेरिका यांच्यात व्यापारी करारा संदर्भात चर्चा सुरू आहेत. भारताकडून शिष्टमंडळ अमेरिकेच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा करत आहे. अमेरिकेला भारतातील कृषी, डेअरी क्षेत्र खुले करण्याची अपेक्षा आहे. भारताने कृषी आणि डेअरीमधील उत्पादनांवर लादलेले आयात शुल्क कमी करावे, अशी अमेरिकेची भूमिका आहे. भारत मात्र त्याला तयार नाही.

### भारतीयांसाठी एक्सचे सबस्क्रिप्शन झाले स्वस्त

**नवी दिल्ली :** इलॉन मस्क यांच्या मालकीच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सने भारतीय वापरकर्त्यांसाठी आनंदाची बातमी दिली आहे. कंपनीने आपल्या प्रीमियम व सबस्क्रिप्शन योजनांच्या दरांमध्ये लक्षणीय कपात केली असून, आता या सेवा परवडणाऱ्या झाल्या आहेत.

मोबाईल ॲपसाठी मासिक प्रीमियम सब्स्क्रिप्शनचा दर ९०० रुपयांवरून थेट ४७० रुपयांवर आणण्यात आला आहे. ही एकूण ४८ टक्के कपात आहे, ज्यामुळे अधिकाधिक वापरकर्ते प्रीमियम फीचर्स वापरण्यास प्रवृत्त होतील. वेब ब्राउझरद्वारे एक्स वापरणाऱ्या युजर्ससाठी प्रीमियम सब्स्क्रिप्शनचे दर आता ६५० रुपयांवरुन ४२७ रुपये झाले आहेत.

# रोहित पवारांवर आरोपपत्र दाखल

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

आमदार रोहित पवार यांना मोठा झटका बसला आहे. मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात ईडीने त्यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल केले आहे. हा गुन्हा मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने २०१९ साली नोंदवला होता. शिखर बँकेचे तत्कालीन अधिकारी व संचालकांनी नियमबाह्य पद्धतीने सहकारी साखर कारखाना त्यांच्या नातेवाइकांना आणि खासगी व्यक्तींना अतिशय कमी दरात विकला होता. मार्च २०२३ मध्ये ईडीने बारामती ॲग्रोच्या ५०.२० कोटी रुपयांच्या मालमत्तेवर तात्पुरती जप्ती कारवाई केली.

## विठ्ठल भक्तांना विठुरायाचे दर्शन घडविण्यासाठी ज्यादा बससेवा

# आषाढी एकादशीमुळे एसटीच्या तिजोरीत ३५ कोटी ८७ लाखांची भर

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

यंदा आषाढी एकादशीनिमित्त एसटी महामंडळाने विठ्ठल भक्तांना पंढरपूर येथील विठुरायाचे दर्शन घडविण्यासाठी ५ हजार २०० ज्यादा बसेस सोडल्या होत्या. त्याचा फायदा तब्बल ९ लाख ७१ हजार ६८३ भक्तांनी घेतला. त्यातून एसटीला ३५ कोटी ८७ लाख ६१ हजारांचे उत्पन्न मिळाले. जे गतवर्षीपेक्षा अधिक असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

या सर्व प्रवाशांची एसटीच्या चालक, वाहकांनी सुरक्षितपणे ने-आण करून त्यांना विठ्ठल दर्शन घडविल्याचे त्यांनी सांगितले. आषाढी एकादशीनिमित्त महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या विठुरायाच्या दर्शनासाठी संपूर्ण राज्यातून श्रीक्षेत्र पंढरपूर येथे मोठ्या संख्येने भाविक वारीसाठी येत असतात. या भाविकांना त्यांच्या गावापासून पंढरपूरपर्यंत ने-आण करण्यासाठी यंदा एसटीने ३ ते १० जुलै दरम्यान, तब्बल ५ हजार २०० ज्यादा बसेस सोडल्या होत्या. या बसेसनी २१ हजार ४९९ फेऱ्या करून ९ लाख ७१ हजार ६८३ भाविकांची सुरक्षित ने-आण केली.

**गतवर्षीपेक्षा ६ कोटी ९६ लाखांचे अधिक उत्पन्न**

**कर्मचारी अधिकाऱ्यांनी पावसातही बजावली अहोरात्र सेवा**

**परिवहन मंत्र्यांकडून कर्मचाऱ्यांना ३ दिवस मोफत फराळ**



गतवर्षी आषाढी यात्रेतील प्रवासी वाहतुकीतून एसटीला एकूण २८ कोटी ९१ लाख ५८ हजार रुपये इतके उत्पन्न मिळाले होते. त्यात यंदा ६ कोटींपेक्षा अधिक वाढ झाल्याचे त्यांनी सांगितले.

### एसटी कर्मचाऱ्यांनी ऊन, वारा, पावसातही बजावले कर्तव्य

या प्रवासी वाहतुकीदरम्यान संबंधित एसटी महामंडळाचे कर्मचारी ऊन, वारा, पावसाची तमा न बाळगता अतिशय निष्ठेने त्यांचे कर्तव्य बजावित असतात. या कर्मचाऱ्यांच्या जेवणाची आबाळ होऊ नये, यासाठी यंदा परिवहन मंत्र्यांनी स्वखर्चाने ५ ते ७ जुलै या सलग तीन दिवस एसटीच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था एकादशीच्या उपवासाच्या पदार्थासह पंढरपूर येथे केली होती. या कर्मचाऱ्यांनी लाखो भाविकांना सुखरूप देवदर्शन घडवून सुरक्षितपणे यांना परत आणल्याने असे हजारो चालक, वाहक, यांत्रिकी कर्मचारी व त्यांना मार्गदर्शन करणारे पर्यवेक्षक व अधिकारी अभिनंदनास पात्र असल्याचे परिवहन मंत्र्यांकडून स्पष्ट करण्यात आले.

# अहमदाबाद विमान अपघातप्रकरणी चौकशी अहवालावर वैमानिकांचा आक्षेप

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था):

अहमदाबाद येथे १२ जून रोजी झालेल्या एअर इंडियाच्या बोईंग ७८७ अपघातप्रकरणी प्राथमिक तपास झाला आहे. एएआयबीच्या तपासानंतर प्राथमिक अहवाल दिला आहे. बोईंग ७८७ प्रकारच्या व एआय १७१ या क्रमांकाच्या विमान अपघाताच्या प्राथमिक अहवालावर आक्षेप घेत वैमानिकांच्या संघटनेने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

या अहवालामध्ये एक वैमानिक दुसऱ्याला ‘इंधन पुरवठा का बंद केला?’ असे विचारताना ऐकू येत आहे. त्यावर दुसऱ्या वैमानिकाने ‘मी नाही केले’ असे उत्तर दिले. अशा प्रकारचे संभाषण झाल्याचे समोर आले आहे. हे संभाषण या अपघातासाठी गृहीत धरू नये, असे एअरलाईन पायलट्स असोसिएशन ऑफ इंडियाने (अल्फा) म्हटले आहे. ‘अहवालातील माहिती आणि चौकशीची दिशा ही पायलटच्या चुकीकडे झुकते आहे.

### चौकशी समितीमध्ये अनुभवी वैमानिकांचा अभाव

या अपघाताच्या चौकशी प्रक्रियेत आवश्यक आणि अनुभवी व्यक्तींना, विशेषतः विमान चालवणाऱ्या लाईन पायलट्सना सहभागी करण्यात आलेले नाही. विशेषतः लाईन पायलट्स अजूनही चौकशी समितीत सामील नाहीत, असा आरोप अल्फाने केला आहे.

**निष्कर्ष काढण्याची घाई करू नये :** अहमदाबादमध्ये झालेल्या एअर इंडिया विमान अपघाताचा अहवाल केवळ प्राथमिक स्वरूपाचा असून, अंतिम निष्कर्ष येईपर्यंत निष्कर्ष काढण्याची घाई करू नये, असे आवाहन नागरी विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांनी केले. राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनीही वैमानिकांमधील संवाद संक्षिप्त असल्याने केवळ बोलण्याच्या आधारावर निष्कर्ष काढता येणार नाही, असे सांगितले.